महाराष्ट्र शासन
# उपवनसंरक्षक (प्रादेशिक) भामरागड, वनविभाग स्थित आलापल्ली यांचे कार्यालय
'वनसंपदा' ईमारत चंद्रपुर रोड, आलापल्ली -४४२७०३
दूरध्वानी क्र.०७१३३-२६६४३२ , E-mail ID- dcfbham@gmail.com

---

**विषय : वनसंवर्धन अधिनियम 1980 अंतर्गत मौजा - ताडगाव येथिल पोलीस मदत केंद्र बांधकामासाठी ता. भामरागड जि. गडचिरोली येथिल सर्व्हे क्र.56 मधिल वाढिव 2.00 हे वनजमिन वनविभागाकडून वळती करण्याबाबत.**

क्रमांक :- कक्ष-1/सर्व्हे/वसअ/प्र.क्र.461/ 497.
आलापल्ली दिनांक :- 14.5.2024.

**प्रति,**

**मा.मुख्य वनसंरक्षक (प्रादे)**
**गडचिरोली**

संदर्भ :- 1. अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक व केद्रस्थ अधिकारी, म.रा.नागपुर यांचे कार्यालयाचे पत्र क्र. प्र.क्र. 17/गड//FCA-S1/PID-12797/2023-2024 /2770 दिनांक 26/12/2023

2.वनसंरक्षक प्रादे, गडचिरोली यांचे कार्यालयाचे पत्र.क्र.कक्ष-2(8)/जमिन/प्र.क्र.437/जा.क्र.3647 दिनांक 05/01/2024

3. पोलीस अधिक्षक गडचिरोली यांचे कार्यालयीन पत्र क्रमांक पोअग/पशा/सिबी-2अ/203(37)/माहिती/153 दिनांक 08.02.2024

---***---

उपरोक्त विषयाचे अनुषंगाणे आपणास सादर करण्यात येते की, वनसंवर्धन अधिनियम 1980 **अमौजा - ताडगाव येथिल पोलीस मदत केंद्र बांधकामासाठी ता. भामरागड जि. गडचिरोली येथिल सर्व्हे क्र.56 मधिल वाढिव 2.00 हे वनजमिन वनविभागाकडून वळती करणाच्या प्रस्तावाचे अनूषंगाणे** संबंधीत यंत्रणेकडून संदर्भीय पत्र क्रमांक 3 अन्वये सूधारीत अहवाल प्राप्त झालेला असून अनूपालन अहवालाचे प्रतिसह खालील स्वाक्षरीकर्ते यांचे अभिप्रायास प्रस्तावाचे अनूषंगाणे महाराष्ट शासनाने उपस्थित केलेल्या मूददा क्र. 1 व 2 ची माहिती खालीलप्रमाणे सादर करून प्रस्ताव पूढिल कार्यवाहीस्तव यासोबत 4 प्रतिमध्ये सादर करण्यात येत आहे.

1मौजा ताडगाव ता. भामरागड जि. गडचिरोली येथिल स. नं. 56 कक्ष क्र575 मधील 2.00 हे वनजमिन सशस्त्र पोलीस दूरक्षेत्राच्या प्रशासकीय इमारतीच्या बांधकामासाठी वळती करण्यास राज्य शासनाने दि. 19.09.2018 रोजीच्या शासन आदेशान्वये यापूर्वी मान्यता दिलेली आहे. प्रस्तूत प्रस्तावाचे अवलोकन केले असता त्याच खंडामध्ये Arm Out Post च्या प्रशासकीय इमारतीच्या बांधकामाचा समावेश केलेला दिसतो. तो प्रस्ताव व संदर्भिय पत्रान्वये सादर केलेला प्रस्ताव भिन्न आहे किंवा कसे ? भिन्न असल्यास एकाच जमिनिवर दोन Arm Out Post उभारणे गरजेचे आहे काय ?

**पोलीस मदत केंद्र ताडगाव करीता कक्ष क्र. 575 सर्व्हे क्र. 56 मधिल 2.00 हे. वनजमिन मागणीचा प्रस्ताव व पूर्वी अस्तित्वात असलेले पोलीस मदत केंद्र हे भिन्न आहे. प्रस्तूत मागणी केलेले क्षेत्र नव्याने वाढिव क्षेत्र असल्यामूळे प्रस्ताव भिन्न सादर केलेला आहे.एकाच वनखंडामध्ये एकच Arm Out Post असून सर्व्हे क्र.56 मधिल 2.00 हे. प्रस्ताव वाढिव वनजमिन मंजूरीबाबतचा आहे.**

**संपूर्ण गडचिरोली जिल्हा नक्षलग्रस्त भाग असून पोलीस मदत केंद्र ताडगाव हददीतील मौजा कसनासूर येथे माहे एप्रील सन 2018 रोजी गडचिरोली जिल्हा पोलीस व नक्षलवादी यांच्यात झालेल्या भिषण चकमकीमध्ये एकून 42 नक्षलांचा खात्मा करण्यात आलेला आहे. त्यामूळे पोमके ताडगाव येथे शासनाकडून सिआरपीएफ व एसआरपीएफ ची अतिरीक्त कूमक तैनात करण्यात येत असल्याने तैनात जवानांना प्रशिक्षण इमारत,निवासस्थान , कर्मचारी बॅरक व इतर सूरक्षा विषयक बांधकाम करणेकरीता मंजूर सर्व्हे क्र.56 मधिल 2.00 हे. जागा ही अपूरी पडत असल्याने पोमके लगतची एकाच खंडातील सर्व्हे क्र.56 मधिल 2.00 हे. वाढिव वनजमिन योग्य व अतिआवश्यक असल्याने वाढिव वनजमिनिचा प्रस्ताव सादर करण्यात आले आहे.**

2.पर्यायी वनीकरणासाठी जमिन प्रस्तावीत केलेली नाही. पोलीस अधिक्षक यांनी वन्नेत्तर जमिन उपलब्ध होत नसल्याबाबत नमूद केले आहे. त्या ठिकाणी वनेत्तर जमिन उपलब्ध होत नसल्यास अन्य जिल्हयातील जिल्हाधिका-यांच्या मदतीने वनेत्तर वनेत्तर जमिन प्रस्तावीत करण्यात यावी.

**पर्यायी वनीकरणाकरीता निवड करण्यात आलेली 4.00 हे क्षेत्राची KML मधिल Properties Mesurement मध्ये दूरूस्ती करण्यात आली असून Properties मध्ये वेधानिक दर्जा नमूद केलेला आहे. तसेच Suitability Certificate मध्ये वैधानिक दर्जा नमूद केले असून सूधारीत KML, Suitability Certificate व C.A. Scheme यासोबत 4 प्रतिमध्ये सहपत्रीत करण्यात येत आहे.**

सहपत्र - वरील प्रमाणे
(अनूपालन अहवाल 4 प्रतिमध्ये)

(शैलेष मिना भा.व.से.)
उपवनसंरक्षक,
भामरागड वनविभाग,आलापल्ली

प्रतिलिपी :- पोलीस अधिक्षक , गडचिरोली याना माहितीस व आवश्यक कार्यवाहीस सस्नेह अग्रेषित.